महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्र.एफएसटी-०८/२४/प्र.क्र.११६/फ-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- १४ ऑक्टोबर, २०२४

संदर्भ:- शासन आदेश समक्रमांक दि.३०.०८.२०२४

## शासन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ च्या कलम ४ (१) व कलम ४(४) येथील तरतुदीनुसार व सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२९.०८.२०२४ च्या सुधारणा अध्यादेशातील कलम ४(४)((क) मधील तरतुदी विचारात घेऊन संदर्भाधीन शासन आदेशान्वये वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. सदर आदेशामधील खालील वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेत अंशत: बदल करून रकाना क्र.४ प्रमाणे सुधारित पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | व.प.अ. चे नाव | दि. ३०.०८.२०२४ च्या आदेशानुसार पदस्थापना | सुधारित पदस्थापना |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | सागर श्रीकृष्ण बन्सोड | व.प.अ., पश्चिम पेंच, घाटपेंढरी वन्यजीव | व.प.अ., पवनी (प्रा.), नागपूर वनविभाग (रिक्त पदावर) |
| २ | पवन पुंडलिकराव बावनेर | व.प.अ., (फिरते पथक) संरक्षण व अतिक्रमण निर्मुलन, यवतमाळ | व.प.अ., फिरते पथक, परतवाडा (रिक्त पदावर) |
| ३ | सत्यफुला प्रल्हादराव सोळंके | व.प.अ., सुसर्दा (प्रा.) | व.प.अ. घटांग (प्रा.) (रिक्त पदावर) |
| ४ | जितेंद्र कृष्णराव ढाले | कोलारा (वन्यजीव) | कार्यरत पदावर मुदतवाढ |
| ५ | सदानंद श्रीराम पाचंगे | व.प.अ., रायपूर (वन्यजीव), सिपना वन्यजीव विभाग | व.प.अ., घटांग (वन्यजीव) (रिक्त पदावर) |
| ६ | वैशाली सुभाषराव भलावी | व.प.अ., वि. व्या. सं. द.-१, तोतलाडोह, पेंच व्याघ्र प्रकल्प | कार्यरत पदावर मुदतवाढ |
| ७ | वसंत बन्सी चव्हाण | व.प.अ., शिरुर (प्रा.) | व.प.अ., नसरापूर (प्रा.) (रिक्त पदावर) |
| ८ | प्रतिभा सुरेश सोनवणे | व.प.अ., संरक्षण व अतिक्रमण निर्मुलन भुसावळ | व.प.अ., हरिश्चंद्रगड राजूर (वन्यजीव) (रिक्त पदावर) |
| ९ | कैलाश राखडुजी धोंडणे | व.प.अ., वनसडी (प्रा.), मध्य चांदा वन विभाग | व.प.अ., वडसा (प्रा.) (रिक्त पदावर) |
| १० | रुपेश अरुण गावित | व.प.अ., सा.व., दिंडोरी | व.प.अ., भंडारदरा (वन्यजीव) (रिक्त पदावर) |

२. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमानुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित

अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी अन्यथा या पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा "अकार्यदिन" (dies-non) म्हणून गणला जाईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

३. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करू नये. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

४. सदरहू आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लघंन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(वि. श. जाखलेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) सर्व मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक
४) महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
५) मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७) संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांना अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या मार्फत.
८) निवडनस्ती (फ-४)